## कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: नप्राशा- १७०६/(११४/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २००६.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,लातूर,नागपूर,अमरावती.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यांस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३७७ (तीनशे सत्याहत्तर) शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी /जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१६२१०५००००१ असा आहे.

( भि.य. मंता )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | फुले एज्युकेशन सोसायटी, पुणे द्वारा सिंहगिरी जंक्शन पो. लासुर्णे ता.इंदापूर | रामटेकडी, औद्योगिक वसाहत | इंग्रजी | १ ली |
| १८ | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर | लोहगांव ता. हवेली | इंग्रजी | १ ली |
| १९ | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर | बावधन,ता.मुळशी | इंग्रजी | १ ली |
| २० | एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी,एव्हरेस्ट हाऊस, २८८/३, भूगाव, पौड रोड,पुणे | भूगाव, मुळशी | इंग्रजी | १ ली |
| २१ | निनाईदेवी शिक्षण संस्था, गुरुप्रसाद अपार्टमेंट, धनकवडी पुणे | धनकवडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| २२ | सिड संस्था, सेंटर फॉर एज्युकेशन ऑफ दि इकॉनॉमिकल डिसेबल, मॉडर्न इंग्लिश, मु.पो. मळवली, ता.मावळ | मळवली | इंगजी | १ ली |
| २३ | महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन ट्रस्ट,राजगुरुनगर, ता.खेड | राजगुरुनगर (कातोरे वस्ती),ता.खेड | इंग्रजी | १ ली |
| २४ | महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिटयूट, दत्त प्रसाद सोसायटी, चंदननगर, खराडी | पेरणे फाटा | इंग्रजी | १ ली |
| २५ | रिझरेशन शिक्षण संस्था, केसनंद, ता.हवेली | केसनंद, ता.हवेली | इंग्रजी | १ ली |
| २६ | पार्वती प्रतिष्ठाण स.नं. २८/१, भोसरी, पुणे | खंडोबामाळ, भोसरी,पुणे | इंग्रजी | १ ली |
| २७ | डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स,५१४, बुधवार पेठ, पुणे | स.न.२८, गंगाननगर,निगडी | इंग्रजी | १ ली |
| २८ | कोल्हापूर नॅशनल एज्युकेशन सोसायटी ,१३५, सैनिक वसाहत, कोल्हापूर | से.न. १८, प्राधिकरण, चिंचवड | इंग्रजी | १ ली |
| २९ | प्रगती शिक्षण संस्था, बोर्डेनगर, थेरगांव,पुणे | बोर्डेनगर, थेरगांव | इंग्रजी | १ ली |
| ३० | एस.एस.पी. प्रसारक मंडळ, स.नं. १५/१, दापोडी, पुणे | स.न. १५/१, दापोडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३१ | बिना एज्युकेशन सोसायटी, लोकमान्य टिळक मार्ग, प्राधिकरण, निगडी | १७३/२, पांडारकर नगर, आकुर्डी,पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३२ | बालभारती एज्युकेशन सोसायटी, दिघी | दिघी | इंग्रजी | १ ली |
| ३३ | समाजविकास शिक्षण मंडळ, सुरसंगम इमारत ५१/७, स्किम नंबर ११, यमुनानगर, निगडी | प्रेमलोक पार्क | इंग्रजी | १ ली |
| ३४ | सद्‌भावना ग्रुप फाउंडेशन, ४१/३, केशवनगर, मुंडवा, पुणे | खराडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३५ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं ६२०/२, वाघोली, हवेली, पुणे | ताथवडे | इंग्रजी | १ ली |
| ३६ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं ६२०/२, वाघोली, हवेली, पुणे | हडपसर | इंग्रजी | १ ली |
| ३७ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं ६२०/२, | वाघोली | इंग्रजी | १ ली |

महाराष्ट्र शासन

<u>शासन परवानगी आदेश</u>

क्रमांक-इंमाशा २०११/( ८८ /११)/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:-१८ नोव्हेंबर, २०११.

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

**विषय :-** इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते इ. १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग <u>कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.</u>

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१४/१०/२०१०
३) संस्थेचा दि.२६/०७/२०११ रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **एस.एस.पी.शिक्षण संस्था, स.न.१५/१, गणेश नगर, दापोडी, पुणे-४११ ०१२** या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या **गणेश इंग्लिश मिडियम स्कूल, दापोडी, पुणे-४११ ०१२** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ. १० वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.

२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.

३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.

४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १० वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.

७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

**( सतीश जोंधळे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे
सचिव, **एस.एस.पी.शिक्षण संस्था, स.न.१५/१, गणेश नगर, दापोडी, पुणे-४११ ०१२** निवड नस्ती, माशि-१.